MHTH120029932021

दाखल तारीख : १८/०६/२०२१
नोंदणी तारीख : १८/०६/२०२१
निकाल तारीख : ११/०२/२०२५
कालावधी: ०३ वर्ष ०७ महिने २४ दिवस

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. ११, बेलापुर**
**नवी मुंबई यांचे न्यायालयात**
(पिठासिन अधिकारी मुदस्सर नदीम)

**नियमित फौ. खटला क्र. ७७६/२०२१** **निशाणी —३०**

| | |
|---|---|
| | गुन्हा कं. ३२/२०२१, कोपरखैरणे पो. स्टे |
| **अभियोगपक्ष** | **महाराष्ट्र राज्य मार्फत**<br>पोलीस निरीक्षक,<br>कोपरखैरणे पोलीस स्टेशन,<br>नवी मुंबई |
| सरकारी वकील | श्री जाधव |
| आरोपी | **ओमप्रकाश मुलचंद गुप्ता**<br>वय— ४५ वर्षे, धंदा — निरंक<br>रा. एसएस २, रूम नं १३४,<br>सेक्टर २, कोपरखैरणे, नवी मुंबई |
| आरोपीतर्फे वकील | प्राजक्ता देशमुख |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | २५/०८/२०२० पुर्वी |
| प्रथम खबरी तारीख | २८/०१/२०२१ |
| आरोपपत्राची दाखल तारीख | १८/०६/२०२१ |
| आरोपपत्र निश्चित केल्याची तारीख | २४/०३/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १९/१०/२०२३ |
| न्यायनिर्णण राखून ठेवल्याची तारीख | निरंक |
| न्यायनिर्णयाची तारीख | ११/०२/२०२५ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख जर हजर असेल तर | निरंक |

| क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर सुटल्याची तारीख | आरोपीने केलेले गुन्हे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४२७ फौ. प्र. स. कलम च्या उद्‌देशाने खटल्याच या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ओमप्रकाश मुलचंद गुप्ता | .. | .. | महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ कलम ५४ अन्वये | निर्दोष | निरंक | —— |

**<u>न्या य नि र्ण य</u>**

(आज दिनांक ११/०२/२०२५ रोजी घोषित)

**१.** आरोपीविरूध्द महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ कलम ५४ अन्वये आरोप ठेवुन संपरिक्षण करण्यात आले आहे.

२. **<u>अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत की—</u>**

फिर्यादी नवी मुंबई महानगरपालिका येथे कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत होते. दिनांक ६ जुलै २०१९ च्या लेखी आदेशान्वये कनिष्ठ अभियंता (अतिक्रमण विभाग) म्हणून काम पाहत असतांना त्यांना आरोपीचे ७.०० x 3.00 मी मोजमापाच्या क्षेत्रफळामध्ये RCC G +2 चे आरसीसी बांधकाम चालु स्थितीत आढळून आले. त्यामुळे आरोपीला जा. क्र नमुंमपा/इविका/अति/३१९०/२०२० दिनांक २५/०८/२०२० रोजीची नोटीस बजावून सदर बांधकाम थांबवण्याचे सुचित करण्यात आले. सदर नोटीस मिळून देखील आरोपीने सदर बांधकाम थांबवले नाही म्हणुन त्यांनी आरोपीविरूध्द

पोलीस स्टेशनला  फिर्याद नोंदविली.

**३.** घटनेसंबंधी वरील स्वरूपाची फिर्याद प्राप्त झाल्यानंतर पोलीस ठाणे अधिकारी कोपरखैरणे यांनी आरोपीविरूध्द गु.र.क्र. II ३२/२०२१ नोंदविला. पोलीस हवालदार श्री विलास कारंडे यांनी  सदर  गुन्हाचा  तपास  केला. तपासकामी त्यांनी घटनास्थळी जावुन पंचनामा तयार केला. गुन्हाशी परिचीत आवश्यक दस्ताऐवज प्राप्त करून साक्षीदारांचे जबाब नोंदवले. तपासाअंती आरोपीविरूध्द सबळ पुरावे मिळुन आल्याने न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले.

**४.** मी आरोपीविरूध्द महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ कलम ५४ अन्वये नि.क्र १२ वर दोषारोप निश्चित केले. सदर दोषारोप आरोपीला वाचुन व समजावुन सांगण्यात आल्याचे दिसुन येते. त्यावर त्यांनी निवेदनाद्वारे गुन्हा कबुल नसल्याचे सांगत संपरिक्षण करण्याची मागणी केली.

**५.** प्रकरणात तपासण्यात आलेले साक्षीदारांचे पुराव्यात आरोपीविरूध्द गोवणारा पुरावा आढळुन आल्याने नि.क्र २९ वर फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे नोंदविण्यात आले आहे. आरोपीने खोटा गुन्हा दाखल केल्याचा बचाव नोंदविला आहे.

**६.** अभियोग पक्षातर्फे सहा सरकारी अभियोक्ता श्री. के.यु. शेख व आरोपीचे वकील श्री प्राजक्ता देशमुख यांचा युक्तिवाद ऐकला.

**७.** प्रकरणात निर्णयाप्रत येण्याकरिता खालील प्रश्न माझे विचारार्थ उपस्थित झाले आहे. त्यावरील माझे निर्णय सकारण पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही पुर्व परवानगी न घेता | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | अनधिकृत आर.सी.सी बांधकाम केले व महानगरपालिकेची दिनांक २५/०८/२०२० रोजीची नोटीस मिळून देखील सदरचे अनधिकृत बांधकाम हटवले नाही आणि त्याद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ चा अपराध केला? | |
| २. | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयातील साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्ष—

| क्र | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | संतोष तुळशीराम गवळी | १८ | फिर्यादी |
| २. | कमलाकर रामचंद्र पाटील | २३ | साक्षीदार |
| २. | विलास बिजाली करांडे | २५ | तपासकीय अधिकारी |

### ब. आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर —

| क्र | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

### क. न्यायालयाकडून साक्षीदार, जर असेल तर —

| क्र | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयातील निशाणी क्रमांकाची यादी

### अ. अभियोग पक्ष—

| क्र | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १९ | फिर्याद |
| २. | २० | छापील एफ. आय आर |
| ३. | २६ | पंचनामा |
| ४ | २७ | आरोपीला दिलेले समजपत्र |

| | | |
|---|---|---|
| ५ | २८ | मनापा आयुक्तांची परवानगीचे पत्र |

**ब. बचाव पक्ष**

| क्र | निशाणी क्र | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**क न्यायालय —**

| क्र | निशाणी क्र | वर्णन |
|---|---|---|
| १ | १२ | दोषारोप |
| २ | २९ | फो. प्र. स कलम ३१३ चा जबाब |

## <u>का र ण मी मां सा</u>

**<u>प्रश्न क्र. १ बाबत :</u>**

**०८.** अभियोग पक्षास आरोप सिध्द करणेकरिता आरोपीने महानगरपालिकेची परवानगी न घेता वाढीव अतिरिक्त बांधकाम केले व महानगरपालिकेची नोटीस मिळून देखील सदरचे अनधिकृत बांधकाम हटवले नाही हे सिध्द करणे आवश्यक होते. त्या करिता अभियोग पक्षातर्फे वर नमुद साक्षीदार तपासण्यात आलेले आहेत.

०९. साक्षीदार क्र १ संतोष तुळशिराम गवळी हे घटनेवेळी महानगरपालिकेचे कर्मचारी होते. यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की सन २००७ पासून ते नवी मुंबई महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता म्हणून कार्यरत होते. ते पहाणी करीत असतांना त्यांना कोपरखैरणे सेक्टर—२ येथे बांधकाम चालु असल्याचे मिळून आले. सदर बांधकाम करणा—यांना बांधकाम अनधिकृत असल्यामुळे वार्ड ऑफीसर यांनी नोटीस दिली होती व अनधिकृत बांधकाम निष्काषीत केले होते. परंतु काही दिवसांनी सदर जागेवर बांधकाम चालु असल्याचे निदर्शनास आले. म्हणून त्यांनी पोलिस ठाण्यात फिर्याद (नि.क्र १९) दिली. आरोपीने आरसीसी जी प्लस २ चे बांधकाम केले होते. तसेच त्यांनी सदर अनधिकृत बांधकामाचा पंचनामा (नि.क्र २१) देखील केला होता. त्यांना

फिर्याद दाखल करण्यासाठी वार्ड ऑफीसर यांनी अधिकारपत्र दिले होते. परंतु त्यांनी मान्य केले आहे की ते आरोपीस ओळखत नाही.

१०        अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र २ कमलाकर रामचंद्र पाटील हे नवीमुंबई महानगर पालिकेत वरीष्ठ लिपीक म्हणून कार्यरत असून दिनांक २५.०८.२०२० रोजी चे से. २, कोपरखैरणे येथील अनधिकृत बांधकामाची पहाणी करीता गेले होते. सदर बांधकाम हे एसएस—२, रूम नं १३४ हे आरोपीचे होते. सदर ठिकाणी केलेल्या अनधिकृत बांधकामाचे मोजमापकरीता पंच म्हणून हजर होते.

११.        अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र ३ विलास बिलाजी करांडे हे तपासकीय अधिकारी असून त्यांचा पुरावा तांत्रिक स्वरुपाचा आहे. सदर प्रकरणाचा प्राथमिक तपास श्री धुमाळ यांनी केला होता व पुढील तपास त्यांच्याकडे देण्यात आला होता. त्यांना फिर्याद, महानगरपालिकेने केलेला पंचनामा, पुरवण्यात आले होते. तपासकामी त्यांनी घटनास्थळाला भेट दिली. सदर ठिकाणी आरोपीने जी प्लस ३ बिल्डींगचे बांधकाम केल्याचे मिळून आल्याने त्याला नोटीस (नि.क्र २७) दिली. आरोपीविरूध्द दोषारोपत्र दाखल करण्यासाठी परवानगीचे पत्र दिले तसेच महानगरपालिकेचे आयुक्त यांनी त्यांना परवानगी (नि.क्र २८) देखील दिली होती. आरोपी विरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

११.        सदर प्रकरणामध्ये आरोपीला नोटीस देवून आरोपीचे अनधिकृत बांधकाम निष्काषीत करण्यात आले होते परंतु तरी सुध्दा आरोपीने पुन्हा अनिधिकृत बांधकाम चालु केले असे अभियोगपक्षाचे कथन आहे. परंतु अभियोग पक्षाने सदर नोटीस अभिलेखावर सिध्द केलेली नाही. अनधिकृत बांधकामाशी आरोपीचा कशाप्रकारे सबंध होता किंवा त्यानेच सदर बांधकाम केले याबाबत कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच सा.

क्र १ यांनी ते आरोपीला ओळखत नसल्याचे कथन केले आहे. कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा जबाब अभिलेखावर दिसून येत नाही.

१२. आरोपीने अनधिकृत बांधकाम केल्यामुळे त्याच्या वर एमआरटीपी कायदया नुसार नोटीसची बजावणी झाली होती असे अभियोगपक्षाचे म्हणणे आहे. परंतु सदरची नोटीस अभिलेखावर सिध्द झालेले नाही. सबब नोटीस मिळून सुध्दा आरोपीने त्याचे अनधिकृत बांधकाम थांबवले नाही हया अभियोगपक्षाच्या कथन विश्वासाहर्य वाटत नाही.

१३. अशा प्रकारे आरोपीविरूध्द लावलेले दोषारोप सिध्द करण्या इतपत निसंशय पुरावा न्यायालया समक्ष आलेला नाही. सबब पुराव्या अभावी आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहे आणि मुद्दा क्र. २ बाबत खालील आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी ओमप्रकाश मुलचंद गुप्ता यांची महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ कलम ५४ या आरोपातून फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७अ चे पुर्ततेकामी रूपये १५,०००/— चा वैयक्तिक व जामीनकीचे बंधपत्रे १५ दिवसांचे आत सादर करावे.

MUDASSAR NADEEM ABDUL NAIM
Digitally signed by MUDASSAR NADEEM ABDUL NAIM
Date: 2025.02.15 14:56:04 +0530

**(मुदस्सर नदीम)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
न्यायालय क्र. ११, बेलापुर, नवी मुंबई.

ठिकाण : बेलापूर.
दिनांक : ११/०२/२०२५